<u>महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान</u>
योजनेस मुदतवाढ देणेबाबत

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :- नगरो-२०१९/प्र.क्र.२४३/नवि-३३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १३ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा:-</u>

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र: नगरो २०१४/प्र. क्र.११९/नवि-३३, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४.
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र: नगरो-२०१५/प्र.क्र.६४/नवि-३३, दिनांक २७ मे, २०१६.
३. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र: नगरो-२०१६/प्र.क्र.३२८/नवि-३३, दिनांक ०४ ऑक्टोबर २०१६.
४. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र: संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२८/नवि-३३, दिनांक १४ फेब्रुवारी,२०१७.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील नागरी भागात मुलभूत पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी व त्यांचा दर्जा वाढविण्याकरिता संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयाच्या तरतूदीन्वये व त्याअनुषंगाने संदर्भाधीन क्र. २, ३ व ४ अन्वये निर्गमित शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.

०२. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानाच्या दिनांक २१.८.२०१४च्या शासन निर्णयानुसार सदर अभियानाचा कालावधी हा शासन निर्णयाच्या दिनांकापासून पाच वर्षाचा होता. त्यानुसार सदर अभियानाचा कालावधी हा दिनांक २०.०८.२०१९ रोजी संपुष्टात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर अभियानाच्या प्रगतीचे पुनर्विलोकन करून योजना पुढे चालु ठेवण्याबाबत निर्णय घेणे अपेक्षित होते.

०३. त्यानुसार संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदीनुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान या योजनेस नागरी स्थानिक संस्थांकडून असणारा वाढता प्रतिसाद, अभियानांतर्गत मंजूर उर्वरीत प्रकल्पांची कामे नागरीकांना सुविधा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने पूर्ण करण्याची आवश्यकता, सदर योजना ही लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी असलेली सर्वंकष एकच योजना, सदर अभियानाच्या अनुषंगाने सध्या असलेली मागणी विचारात घेता सदर अभियान पुढे चालू ठेवण्याबाबत अभियानाचे पुनर्विलोकन करून निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केल्याच्या पार्श्वभूमीवर, शासनाने महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

अ) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानाचा कालावधी हा योजनेच्या दिनांक २१.८.२०१४च्या शासन निर्णयानुसार ५ वर्षाचा आहे. सदर कालावधी दिनांक २०.०८.२०१९ रोजी संपुष्टात येत असलेने, उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमूद योजनेचे पुनर्विलोकन पाहता, सदर योजनेस दिनांक २०.८.२०१९ पासून पुढील ५ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

ब) तदनंतर, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानाचे पुनर्विलोकन करून योजना पुढे चालु ठेवण्याबाबत तत्कालीन परिस्थितीनुरुप निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक २०१९०९१३१८४३५३१७२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.09.13 21:19:37 +05'30'

(पां.जो.जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (सर्व विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (सर्व विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव कार्यालयाचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांचे स्वीय सहायक,जी.टी, रुग्णालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. महानगर आयुक्त, एमएमआरडीए, मुंबई.
११. व्यवस्थापकीय संचालक, एम.यु.आय.डी.सी.एल, मुंबई.
१२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१३. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई.
१४. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
१५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१६. संचालक, नगररचना, पुणे.
१७. विभागीय आयुक्त, (सर्व).
१८. जिल्हाधिकारी,(सर्व).
१९. आयुक्त सर्व संबंधित महानगरपालिका.
२०. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती.
२१. निवडनस्ती, नवि-३३.